संक्षिप्त

मत्स्यव्यवसाय मंत्री नितेश राणे धावले अपघातग्रस्ताच्या मदतीला !

चिपळूण : रत्नागिरी जिल्हा दौऱ्यावर असताना राज्याचे मत्स्यव्यवसाय आणि बंदरे विकास मंत्री नितेश राणे यांनी माणुसकीचं दर्शन घडवलं. चिपळूण-गुहागर बायपास रस्त्यावर एका दुचाकीचा अपघात झालेला पाहून त्यांनी आपला ताफा थांबवला आणि स्वतः अपघातग्रस्ताच्या मदतीसाठी धावले. त्यानून माणुसकीचे दर्शन झाले. गुहागर बायपास रस्त्यावर एक दुचाकीस्वार जखमी अवस्थेत पडलेला होता. हा अपघात पाहिल्यानंतर ना. नितेश राणे यांनी तत्काळ आपल्या सुरक्षारक्षकांना मदतीसाठी पुढे पाठवले. त्यांनी स्वतः लक्ष चालून रुग्णवाहिकेला बोलावून घेतले. अपघातातील जखमी व्यक्तीला त्वरीत रुग्णालयात हलवून त्याच्यावर योग्य उपचार सुरू होतील, याची त्यांनी खात्री केली. दरम्यान, मंत्रिपद कितीही मोठं असलं तरी माणूस म्हणून असलेली संवेदनशीलता किती महत्त्वाची असते, हेच एक जबाबदार मंत्री म्हणून ना. नितेश राणे यांच्याबाबत या घटनेतून दिसून आलं आहे. याबद्दल उपस्थित लोकांनी ना. राणे यांना धन्यवाद दिले.

बिहार येथील बेपत्ता महिला पाचलमध्ये सापडली

पाचल : बिहार येथून बेपत्ता झालेली महिला रायपाटण पोलिसांच्या सर्तकतेमुळे पाचल - तळवडे येथे सापडली असून तिला आपले घर मिळाले आहे. त्यामुळे रायपाटण पोलीस दुरक्षेत्राचे साहाय्यक पोलीस फौजदार कमलाकर पाटील, कॉन्स्टेबल रामदास पाटील, रामकृष्ण काळे यांची परिसरातून प्रशंसा होत आहे. गेले तीन चार दिवस एक अनोळखी महिला तळवडे, मूर, कार्जिडा या गावात रस्त्याने फिरताना अनेकांनी पाहिली. ही महिला कोणाच्या घरात, दुकानतही घुसत होती. काही ठिकाणी चालत्या वाहनात ती दगड मारत होती. वेडसरपणे वागणऱ्या या महिलेची माहिती काही ग्रामस्थांनी रायपाटण पोलिसांना दिली. घटनेची माहिती मिळताच रायपाटणचे सहाय्यक पोलीस फौजदार कमलाकर पाटील व त्यांचे सहकारी पो. कॉ. रामदास पाटील, रामकृष्ण काळे यांनी या महिलेला ताब्यात घेतले. पुढील चौकशी करता ती बिहार येथून बेपत्ता असल्याचे समजले. या प्रकरणी तिच्या नातेवाईकांशी संपर्क साधण्यात आला. नातेवाईक येण्यास चार पाच दिवसाचा कालावधी लागणार असल्याने तिला सखी वन स्टॉप रत्नागिरी येथे दाखल करण्यात आले आहे. पोलिसांच्या सर्तकतमुळे एका बेपत्ता महिलेला आपले गाव व नातेवाईक मिळू शकले आहेत.

वैभव खेडेकर यांचा ४ रोजी भाजपमध्ये प्रवेश

खेड शहर : महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे कोकण विभागीय संघटन संपर्कक तसेच राज्य सरचिटणीस व खेडचे माजी नगराध्यक्ष वैभव खेडेकर हे भाजपमध्ये प्रवेश करणार असल्याची घोषणा राज्याचे मत्स्य व बंदर विकास मंत्री नितेश राणे यांनी सोमवारी खेडमध्ये केली. त्यांच्यासोबत मनसेमध्ये बडतर्फ करण्यात आलेले पदाधिकारी यांचाही पक्षप्रवेश होणार असल्याचे त्यांनी यावेळी जाहीर केले. खेड नगर परिषदेच्या निवडणूकीत जनतेमधून महाराष्ट्र नवनिर्माण सेनेतर्फे निवडून येणारे ते पहिले नगराध्यक्ष असल्याचेही आठवण त्यांनी सांगितली. मनसेच्या स्थापनेपासून सलग पंधरा वर्षे नगरपालिका त्यांची सत्ता होती. त्यामुळे ते जनसामान्य नागरिकांचे प्रश्न सोडवणारे नेते म्हणून ओळखले जातात असेही त्यांनी यावेळी सांगितले. भाजपाचे प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांच्या प्रमुख उपस्थितीत ४ सप्टेंबर रोजी दुपारी ३ वाजता मुंबई येथे त्यांचा व प्रमुख सहकाऱ्यांच्या पक्षप्रवेशाचा कार्यक्रम होईल. मंत्री नितेश राणे आज खेडमध्ये आल्यानंतर खेडच्या राजाचे दर्शन घेतले व वैभव खेडेकर यांच्या निवासस्थानी जाऊन त्यांच्या गणपतीचेही दर्शन घेतले व चर्चा केली त्यानंतर मणगे येथील हॉटेल साई रिसॉर्ट येथे पत्रकार परिषदेत त्यांच्या प्रवेशाची घोषणा केली. वैभव खेडेकर यांच्या बरोबर अविनाश सौंदळकर, संतोष नलावडे, सुबोध जाधव, खेडचे तालुकाध्यक्ष नीलेश बामणे यांचा समावेश आहे. पत्रकार परिषदेला भाजपाचे जिल्हाध्यक्ष मोरे, माजी जिल्हाध्यक्ष केदार साठे, चिपळूणचे प्रशांत यादव खेडचे तालुकाप्रमुख ऋषिकेश मोरे आधी पदाधिकारी उपस्थित होते.

खराब हवामानामुळे रो-रो बोट सेवेचा 1 सप्टेंबरचा मुहूर्त हुकला !

लवकरच चाचणी घेऊन सेवा सुरू होणार

सिंधुदुर्ग : पुढारी वृत्तसेवा

कोकणात जाणाऱ्या चाकरमान्यांच्या प्रवास अधिक सुखकर व्हावा या उद्देशाने राज्य शासनाने मुंबई ते जयगड (रत्नागिरी) आणि मुंबई ते विजयदुर्ग सिंधुदुर्ग अशी रो-रो बोट सेवा सुरू करण्याचा निर्णय घेतला आहे. या सेवेला आक्षयक सर्व परवानग्या प्राप्त झाल्याने ही सेवा १ सप्टेंबरपासून सुरू होणार होती. तसे नियोजन सागरी मंडळाने केले होते. मात्र गेल्या काही दिवसापासून सुरू असलेला पाऊस आणि खराब हवामानामुळे रो-रो बोट सेवेसाठी आक्षयक असलेली चाचणी घेता न आल्याने रो-रो सेवेचा १ सप्टेंबरचा मुहूर्त हुकला आहे. मात्र लवकरच ही सेवा सुरू होणार असल्याचे संबंधित विभागाकडून सांगण्यात आले.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या संकल्पनेतून आणि मत्स्य व्यवसाय, बंदरे विकासमंत्री नितेश राणे यांच्या पुढाकारातून मुंबई ते कोकण असा समुद्रामार्ग प्रवास करण्यासाठी रो-रो सेवा सुरू करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. यद्रे तर यंदा गणेशोत्सवाला वेणाऱ्या चाकरमान्यांचा प्रवास या रो-रो बोट सेवेतून करण्याचे नियोजन करण्यात आले होते. मात्र हवामानातील बदलांमुळे ही सेवा काहीशी लांबली होती. दरम्यान काही दिवसापूर्वी केंद्रिय शिपिंग मंत्रालय आणि राज्याच्या बंदरे विभागाने या जलवाहतूक सेवेस अंतिम मंजुरी देत आक्षयक १४७ परवानग्या दिल्यानंतर १ सप्टेंबरपासून ही रो-रो बोट सेवा सुरू करण्यात वेणार असल्याची माहिती मंत्री नितेश राणे यांनी दिली होती. त्यामुळे या रो-रो सेवेबद्दल सर्वांनाच उत्सुकता होती. या रो-रो सेवेचे दरही जाहीर करण्यात आले होते. तसेच या रो-रो सेवेसाठी आक्षयक बोटही सज्ज करण्यात आली होती. स्वतः मंत्री नितेश राणे यांनी या अद्ययावत बोटीतील आसन व अन्य सुविधांची पाहणी केली होती.

सिंधुदुर्गात या रो-रो सेवेसाठी विजयदुर्ग बंदर येथे प्रवासी जेटीचे रूपांतर रो-रो जेटीत करण्यासह इतर कामे करण्यात आली होती. मात्र खराब हवामानामुळे १ सप्टेंबरचाही मुहूर्त हुकला आहे. सागरी मंडळाचे मुख्य कार्यकारी अधिकारी प्रदीप पी यांनी हवामान बदलामुळे रो-रो बोटीच्या चाचण्या घेणे अशक्य होत आहे. चाचण्यांसाठी हवामान योग्य झाल्यास चाचण्या घेवून रो-रो सेवा सुरू केली जाईल. शक्य तितक्या लवकर ही सेवा सुरू करू. सेवा कधी सुरू होणार याची माहिती लवकरच जाहीर करू असेही त्यांनी सांगितले. त्यामुळे या सेवेची तुर्तास तरी प्रतीक्षाच आहे.

वेटरच्या खुनातील तिसऱ्या आरोपीच्या मुसक्या आवळल्या

वेटरला मारून आंबा घाटातील दरीत फेकले

रत्नागिरी : पुढारी वृत्तसेवा

रत्नागिरीच्या मिरजोळे येथील प्रेयसीच्या खुनातील प्रियकर आरोपी दुर्वास पाटील आणि विश्वास पवार यांनी तिसऱ्या एका साथीदाराच्या मदतीने देशी बारमधील वेटरचा गळा आवळून खून केल्याचे तपासादरम्यान उघड झाले. या वेटरच्या खुनातील तिसरा आरोपी नीलेश रमेश भिंगार्डे ३५, रा. इस्लामपूर, जि. सांगली) याला जयगड पोलिसांनी अटक केली आहे. या आरोपीलाही ८ सप्टेंबरपर्यंत पोलीस कोठडीत ठेवण्याचे आदेश न्यायालयाने दिले आहेत.

विवाहासाठी तगादा लावणाऱ्या प्रेयसीचा केवलने गळा आवळून तिला आंबा घाटातील दरीत फेकून देण्याच्या आरोपाखाली खंडाळ्यातील देशीबार मालक दुर्वास पाटील याच्यासह बारचा मॅनेजर विश्वास पवार आणि सुरातन गळकर यांना शहर पोलिसांनी अटक केली. या तिघांच्या चौकशीत या आरोपींनी दुर्वास पाटीलच्या मालकीच्या बारमधील वेटरचाही अशाच पद्धतीने खून केल्याचे निष्पन्न झाले होते. या गुन्ह्यामध्ये दुर्वास आणि सुशांतसह सांगलीच्या इस्लामपूरमधील एका आरोपीचा सहभाग असल्याचे उघड झाले होते. रत्नागिरी शहर पोलिसांनी ही माहिती जयगड पोलिसांकडे कळवल्यावर पोलिसांनी सांगलीतील नीलेश भिंगार्डे याला अटक केली. त्याला सोमवारी न्यायालयासमोर हजर केले असता न्यायालयाने आरोपीला ८ सप्टेंबरपर्यंत पोलीस कोठडीचे आदेश दिले आहेत.

काटा काढल्याच्या आनंदात केला डान्स

प्रेयसीच्या खून प्रकरणात अटकेत असलेला दुर्वास पाटील हा इतका निर्दयी होता की, प्रेयसीचा मृत्यू झाल्याचे लक्षात आल्यानंतर, आपल्या मार्गातील काटा काढल्याच्या आनंदात तो त्याच ठिकाणी काही वेळ बेभान होऊन नाचत होता, अशी माहितीही पोलीस चौकशीत पुढे आली आहे. थंड डोक्याच्या या क्रूरकर्माच्या अनेक कथाही आता खंडाळ्यात चर्चिल्या जाऊ लागल्या आहेत. दुर्वासने बारमधीलच आणखी दोन वेटरचाही अशाच पद्धतीने संपवले. मात्र मेली दीड दोन वर्षे तो उपहकीस आला नव्हता.

विसर्जनादिवशी वाहतूक मार्गात बदल

रत्नागिरी : मंगळवार २ सप्टेंबर रोजी गौरी गणपती, ४ सप्टेंबर रोजी ९ दिवसांचे गणपती, ६ सप्टेंबर रोजी अनंत चतुर्दशी आणि ७ सप्टेंबर रोजी अनंत चतुर्दशीच्या दुसऱ्या दिवशी सार्वजनिक व खासगी गणेशमूर्तीचे मोठ्या संख्येने विसर्जन होणार आहे. त्यामुळे या दिवशी रामनाका-राधाकृष्ण नाका-गोखले नाका-विठ्ठल मंदिर-कप्तिन भवन या मार्गावर वाहतूक बंद ठेवण्यात येणार आहे.

रामनाका-तेलीआळी नाका-आठवडा बाजार चौक-भुते नाका-मत्स्यालय-मांडवी समुद्र किनारा या पर्यायी मार्गावर वाहतूक सुरू राहील. याबाबत पोलीस अधीक्षक नितीन बगाटे यांनी वाहतूक नियंत्रण अधिसूचना प्रसिद्ध केली आहे. नागरिकांनी सूचनांचे पालन करण्याचे आवाहन केले आहे.

जाहीर प्रगटन

मी, डॉ. संतोष महादू गायकवाड, अध्यक्ष, गुरुदत्त एण्ट्युकेशन सोसायटी ठाणे (नो. क्र. / एफ- ६०१८/अहमदनगर) असे जाहीर करतो की, न्यू गुरुकुल स्कूल, ठाणे, ता. ठाणे ही मराठी माध्यमाची अनुदानित शाळा पीपल्स एज्युकेशन सोसायटी (नो. क्र. / एफ-६ / मुंबई), ता. जि. ठाणे यांचेकडून आमच्या संस्थेकडे हस्तांतरित करण्याचे ठरले आहे. याबाबत कोणतीही व्यक्ती वा संस्था यांचे आक्षेप किंवा हरकती असल्यास विभागीय शिक्षण उपसंचालक चर्नीरोड, मुंबई यांच्या कार्यालयास १५ दिवसांचे आत लेखी स्वरूपात कळवावे.

सही/-
डॉ. संतोष महादू गायकवाड
अध्यक्ष, गुरुदत्त एण्ट्युकेशन सोसायटी
संपर्क : ९२२०८९४१३
ई-मेल : santosh_neev@yahoo.com

जाहीर नोटीस

माझे अशिल यांनी दिलेल्या माहितीवरून ही जाहीर नोटीस देत आहे की, माझे अशिल श्री. दिलावर अली हैदर शेख, हे दुकान क्र. C-२४, देवनार म्युनिसिपल कॉलनी, गोवंडी, मुंबई ४०००४३, ही मिळकत श्री. शंकरलाल माणिकलाल जैन यांचे नावावरून स्वतःचे नावे हस्तांतरित करीत आहे.

तरी सदर मिळकतीबाबत जर कोण व्यक्तीचा, संस्थेचा, बँकेचा किंवा अन्य कोणत्याही कंपनीचा दावा, बोजा, हक्क, अधिकार किंवा हरकत असल्यास माझ्या खालील पत्त्यावरती वा मा. प्रशासकीय अधिकारी (मालमत्ता), मुंबई महानगरपालिका, एम / ईस्ट वार्ड, गोवंडी, मुंबई ४०००४३ या पत्त्यावरती आपली हरकत १५ दिवसांच्या आत पुरावानिशी सादर करावी. अन्यथा सदरहू यांचे माझे अशिलावर बंधनकारक राहणार नाहीत.

दिनांक : ३१.०८.२०२५
ठिकाण : मुंबई

ॲड. एस. एम. शाह
बी. कॉम, एलएल. एम.
कार्यालय क्र. ४, तळमजला,
आरएनसी कॉर्पोरेट, खोब्रागी लेन,
घाटकोपर (पू), मुंबई- ४०००७७
मोबाईल : ९३१६२६७४६५

जाहीर प्रगटन

मी, डॉ. संतोष महादू गायकवाड, अध्यक्ष, गुरुदत्त एण्ट्युकेशन सोसायटी ठाणे (नो. क्र. / एफ- ६०१८/अहमदनगर) असे जाहीर करतो की, न्यू गुरुकुल स्कूल, ठाणे, ता. ठाणे ही मराठी माध्यमाची अनुदानित शाळा पीपल्स एज्युकेशन सोसायटी (नो. क्र. / एफ-६ / मुंबई), ता. जि. ठाणे यांचेकडून आमच्या संस्थेकडे हस्तांतरित करण्याचे ठरले आहे. याबाबत कोणतीही व्यक्ती वा संस्था यांचे आक्षेप किंवा हरकती असल्यास विभागीय शिक्षण उपसंचालक चर्नीरोड, मुंबई यांच्या कार्यालयास १५ दिवसांचे आत लेखी स्वरूपात कळवावे.

सही/-
डॉ. संतोष महादू गायकवाड
अध्यक्ष, गुरुदत्त एण्ट्युकेशन सोसायटी
संपर्क : ९२२०८९४१३
ई-मेल : santosh_neev@yahoo.com

संजय गांधी निराधार योजना तालुका समिती स्थापन

रत्नागिरी : संजय गांधी निराधार अनुदान योजनेंतर्गत प्राप्त होणारे अर्ज छाननी करून निर्णय घेण्यासाठी रत्नागिरी तालुका पातळी संजय गांधी निराधार समिती स्थापन करण्यात आली आहे.

जाहीर प्रगटन

मी, डॉ. संतोष महादू गायकवाड, सचिव, सिद्धार्थ वेलफेयर सोसायटी, ता. जि. ठाणे (नो. क्र./एफ-४४९९३/ ठाणे) असे जाहीर करतो की, नौपाडा मिडल स्कूल, ठाणे, ता. जि. ठाणे ही मराठी माध्यमाची अनुदानित शाळा पीपल्स एज्युकेशन सोसायटी (नो. क्र./एफ-६/मुंबई), ता. जि. ठाणे यांचेकडून आमच्या संस्थेकडे हस्तांतरीत करण्याचे ठरले आहे. याबाबत कोणतीही व्यक्ती वा संस्था यांचे आक्षेप किंवा हरकती असल्यास विभागीय शिक्षण उपसंचालक चर्नीरोड, मुंबई यांच्या कार्यालयास १५ दिवसांचे आत लेखी स्वरूपात कळवावे.

सही/-
डॉ. संतोष महादू गायकवाड
सचिव, सिध्दार्थ वेलफेअर सोसायटी
संपर्क : ९२२०८९४१३
ई-मेल : santosh_neev@yahoo.com

ठाणे महानगरपालिका, ठाणे

विद्युत विभाग
निविदा सूचना

वर्तकनगर प्रभाग समिती अंतर्गत उपवन तलाव येथील म्युझिकल फाउंटन करिता APFC पॅनल बसविणे व मांजिवाडा मानपाडा प्रभाग समिती अंतर्गत कापुरबावडी येथील ठाणे महानगरपालिकेच्या आशर वॅचर इमारतीतील २ उद्वाहनांची वार्षिक, निगा देखभाल व दुरुस्ती करणे या कामाकरीता निविदा ई टेंडरिंग पध्दतीने दि. ०३/०९/२०२५ ते दि.१०/०९/२०२५ या कालवधीत मागविण्यात येत आहेत. निविदा ई टेंडरिंग पध्दतीने https://mahatenders.gov.in वर दि.१०/०९/२०२५ पर्यंत दुपारी ३.०० या वेळेत स्विकारण्यात येतील व दि. १०/०९/२०२५ रोजी दुपारी ३.३० वाजता उद्घाटयात येईल.

टामप्रा/फिडर/आ/विद्युत-कळवा/५९६/२०२५-२६ सही/-
दि:०१.०९.२०२५ उपनगर अभियंता
Pls visit our official web-site ठाणे महानगरपालिका, ठाणे
www.thanecity.gov.in

सार्वजनिक निविदा सूचना

श्री भाटिया वाडी ट्रस्ट, पी.टी.आर. क्र. ए-१८९४(मुंबई), यांचे विश्वस्त, श्री भाटिया वाडी, टिळक रोड, घाटकोपर (पूर्व), मुंबई - ४०००७७ येथे करावयाच्या खालील पुरवठा/कामांसाठी प्रतिष्ठित पुरवठादार/कंत्राटदारांकडून निविदा मागविल आहेत.

ट्रस्टने मंजूर केलेल्या डिझाइनसुार, अग्निरोधक आणि हवामान-प्रतिरोधक असलेल्या फायबर-आधारित रेनी-ड्यूटी वेडिंग डेकरेच्या पुरवठ्यासाठी निविदा मागण्यिवात येत आहे. यामध्ये एफआरपी डेकोरेटिव्ह पॅनल्स, फायबर स्क्रीन्स, फायबर बॅकड्रॉप्स, फायबर पिलर्स, फायबर चोरी, शोभिवंत कमानी, फायबर कारंजे, थिमॅटिक स्टँड्स आणि पेडस्टल्स यांचा समावेश आहे.

ट्रस्टच्या ३ हॉलमध्ये स्थापित करण्यासाठी, P१.५ GOB (म्यु ऑन बोर्ड) इनडोअर एलईडी डिस्प्ले ड्राय कास्ट कॅबिनेटसह (माप: ३१० मिमी x १६० मिमी, पिक्सेल पिच: १.५ मिमी), P२.५ GOB इनडोअर एलईडी डिस्प्ले ड्राय कास्ट कॅबिनेटसह (माप: ३२० मिमी x १६० मिमी, पिक्सेल पिच: २.५ मिमी) आणि सोबत कंट्रोल कार्ड/प्रोसेसरच्या पुरवठा, स्थापना, नियंत्रण आणि संचालनासाठी निविदा मागविण्यात येत आहे. वरील एलईडी स्क्रीनसाठी वायरिंग, केबलिंग, इन्स्टॉलिंग, लाइव्ह व्हिडिओ मिक्सिंग, कॅमेरा फीड, प्रेझेंटेशन आणि बॅकग्राउंड चिन्ह्यअलचे व्यवस्थापन यासह नियंत्रण आणि संचालनाच्या (मजुरी किंवा संयुक्त तत्त्वावर) कामासाठी/कंत्राटासाठी निविदा मागविण्यात येत आहे. तसेच, वास्तुविशारदाच्या आराखड्यानुसार/रेखांकनानुसार ट्रस्टच्या इमारती/मालमत्तेच्या दुरुस्ती/नूतनीकरणासाठी/पुरवठ्यासाठी टाइल्स आणि सिल्हिल्ट/इंटिरियर/एक्सटीरियर (मजुरी किंवा संयुक्त तत्त्वावर) नवीन/दुरुस्तीची कामे, जसे की टाइल्स/फ्लोअरिंगचे काम, पीओपी फॉल्स सीलिंग, इलेक्ट्रिकल काम, सीसीटीव्ही कॅमेरे, कॉम्प्युटर/प्रिंटर, एअर कंडिशनिंगचे वार्षिक देखभाल करार, इलेक्ट्रिकल सिस्टिमच्या पुरवठा, ट्रस्टच्या मालमत्तेची रंगरोटी, पर्जिंग, बुश पॉलिशिंगचे काम, प्लंबिंग, वॉटर पुरिफिकेशन आणि इतर अनुषंगिक कामासाठी निविदा मागविण्यात येत आहे. यामध्ये टाइल्स/सिल्हिल साहित्य/इलेक्ट्रिकल/बुंधकर/रंग/लाकूड/फर्निचर/प्लायवूड/लॉमिनेट्स/विनियर्स/वुडन मोल्डिंग्ज, सीसीटीव्ही कॅमेरे/कॉम्प्युटर इत्यादींच्या पुरवठ्यासाठ समावेश आहे.

वरील सर्व पुरवठा आणि स्थापना खालील ठिकाणी करावयची आहे:-
अ) माझ्म/मिंट/बेसिल/बेलिफ हॉल/ऑफिस एरिया आणि व्हरांडा, अंदाजे २०,००० चौरस फूट क्षेत्रफळ आणि
ब) टुरटवे मोकळे मैदान, अंदाजे ५,००० चौरस फूट क्षेत्रफळ.

करावयाच्या विविध कामांची/पुरवठ्याची माहिती/जाणीवी पाहणी वरील पत्त्यावर ट्रस्टच्या कार्यालयात दुपारी १ ते ४ च्या दरम्यान उपलब्ध आहे आणि निविदा ही सूचना प्रसिद्ध झाल्यापासून ७ दिवसांच्या आत श्री. भाटिया वाडी, टिळक रोड, घाटकोपर (पूर्व), मुंबई - ४०००७७ येथील ट्रस्ट कार्यालयात सादर करावी.

दिनांक : ०२.०९.२०२५

सही/-
विश्वस्त

PRIME FOCUS LIMITED

प्राईम फोकस लिमिटेड

कॉर्पोरेट आयडेंटी क्रमांक (सीआयएन): L92100MH1997PLC108981
नोंदणीकृत कार्यालय : प्राईम फोकस हाऊस, लिंकिंग रोड, सिटी बँक समोर, खार (पश्चिम), मुंबई ४०० ०५२. **दूरध्वनी क्रमांक :** ०२२ २६५५ ९१००
संकेतस्थळ : www.primefocus.com **ई-मेल आयडी :** ir.india@primefocus.com

प्राईम फोकस लिमिटेडच्या १८ व्या वार्षिक साधारण सभेच्या संदर्भातील माहिती जी हिंदीऐवजी कॉन्फरन्सिंग/अन्य माध्यमाद्वारा दृकश्राव्य माध्यमे यांच्या माध्यमाद्वारे घेण्यात येत आहे

याद्वारे सूचित करण्यात येते की प्राईम फोकस लिमिटेड ("कंपनी") कंपनी सदस्यांची १८ वी वार्षिक सर्वसाधारण सभा ("एजीएम") सोमवार, दिनांक २० ऑक्टोबर २०२५ रोजी दुपारी ३.३० वाजता (भारतीय प्रमाण वेळेच्या अनुसार) लिंकिंग रोड, कॉन्फरन्सिंग ("व्हीसी")/अन्य माध्यमाद्वारा दृकश्राव्य माध्यमे ("ओएव्हीएम") यांच्या माध्यमाद्वारे, सामायिक ठिकाणी सदस्यांच्या इच्छेच्या उपस्थितीच्या शिवाय करावे करावयाचा ठराव ("ठराव") च्या सादरीच्या अनुसार (म्हणजे खालील "ठराव"), खाली नमद केलेल्याही कामाच्या अटीच्या पुढ्याच्या योग्य अनुसार व्यवस्थापन म्हणजे अनुसरून आणि लागू असलेल्या अनुसार आणि लेखी (लिखित अभिलिखित और डिकलेरेशन रिकॉर्ड्सह) २०१५ ("लिस्टिंग रेग्युलेशन्स") अंतर्गत कॉर्पोरेट व्यवहार मंत्रालयाने परिपत्रके दिनांक ११ मेद्रि २०२०, सामान्य परिपत्रक दिनांक १३ एप्रिल २०२०, सामान्य सामान्य सामान्य म्हणजे अनुक्रमांकाने अन्य परिपत्रके आणि अनेकवेळा परिपत्रक क्रमांक ०१/२०२ दिनांक १२ ऑक्टोबर २०२२ च्या अनुसार (म्हणजे त्यांच्या एकत्रित सुधारणा "एमसीए परिपत्रके" असा म्हणजेच केला आहे) आणि सिक्युरिटीज और एक्सचेंज बोर्ड ऑफ इंडिया ("सेबी") परिपत्रक क्रमांक सेबी/एचओ/सीएफडी/सीएमडी-१/पी/सीआयआर/२०२२/१३३ दिनांक ०७ ऑक्टोबर २०२२ आणि या संदर्भातील अन्य परिपत्रके जी लिस्टिंग रेग्युलेशन्स च्या अनुसरणाच्या म्हणजे अनुसरण देण्याच्या संदर्भाने आहेत त्याच्या अनुसार आणि वार्षिक सर्वसाधारण सभेची सूचना दिनांक १३ ऑगस्ट २०२५ रोजी लागू करण्यात आलेल्या नियमांच्या अनुसार देण्यात येत आहे. वार्षिक सर्वसाधारण सभेचे ठिकाण हे कंपनीचे नोंदणीकृत कार्यालय प्राईम फोकस हाऊस, लिंकिंग रोड, सिटी बँक समोर, खार (पश्चिम), मुंबई ४०० ०५२ हे असणार आहे.

कॉल आणले म्हणजे आमंत्रणे दिलेली व्यक्तीच म्हणजे सदस्य म्हणजे सदस्य म्हणजे सदस्य